दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
# रायगड नगरी
• वर्ष १६ वे • अंक १७० • MAHMAR/2006/17212 • रायगड • मंगळवार दि.१४ सप्टेंबर २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# तळोजा येथील चंद्रवीलास बार आणि पनवेल येथील टोपाझ बारवर कारवाई

## ७१ जणांवर गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**पनवेल परिसरात सुरू असलेल्या बारमध्ये नियमाचे उल्लंघन सुरू असल्याचे दिसून येत आहे. दोन दिवसात तळोजा येथील चंद्रवीलास बार आणि पनवेल येथील टोपाझ बार वर कारवाई करत एकूण ७१ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. मध्यरात्री अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पराग सोनवणे आणि त्यांच्या टीमकडून कारवाई करण्यात आली आहे. त्यांनाा नोटीस सुद्धा बजावण्यात आली आहे. आधी पनवेल तालुक्यातील साई निधी टोपाझ बार वर कारवाई केल्यानंतर तळोजा येथील चंद्रवीलास बार वर पोलिसांनी कारवाई करत ग्राहक आणि हॉटेल स्टाफवर गुन्हे दाखल केले आहे.**




पनवेल परिसरात सुरू असलेल्या बारमध्ये नियमाचे उल्लंघन सुरू असल्याचे दिसून येत आहे. पनवेल तालुक्यातील साई निधी टोपाझ बार वर कारवाई केल्यानंतर तळोजा येथील चंद्रवीलास बार वर दिनांक १२ सप्टेंबर च्या मध्यरात्री अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पराग सोनवणे आणि त्यांच्या टीमकडून कारवाई करण्यात आली आहे. त्यांना नोटीस बजावण्यात आली आहे.

गुप्त पद्धतीने चालू करून शासनाने दिलेल्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी तब्बल ३९ जणांवर कारवाई करण्यात आली आहे.

याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याआधी पनवेल तालुक्यातील कोन येथे साई निधी टोपाझ बार वर याच पथकाने कारवाई केली होती.

> आम्हाला मिळालेल्या माहिती नुसार आम्ही बार ठिकाणी पोचलो. बार बाहेरून बंद करून ग्राहकांसाठी गुप्त पद्धतीने सुरू असल्याचे निदर्शनास आले. आम्ही नियमानुसार कारवाई करत तलोजा पो स्टेशन मध्ये गुन्हा दाखल केला आहे.
>
> **पराग सोनावणे, व.पो निरीक्षक,**
> **अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष**

१० सप्टेंबर रोजी टोपाझ बार विहित वेळेत बंद करून ग्राहकांसाठी गुप्त पद्धतीने पुन्हा चालू केले असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा नवी मुंबई यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांच्या पथकाने या ठिकाणी धाड टाकली. यावेळी साई निधी टोपाझ बार सुरू असल्याचे निदर्शनास आले.

शासनाने दिलेल्या आदेशाचे उल्लंघन करत असल्याने याप्रकरणी १४ महिला वेटर, नऊ ग्राहक आणि नऊ पुरुष वेटर मॅनेजर यांच्यासह ३२ जणांवर कारवाई करण्यात आली होती. त्यांना नोटीस बजावण्यात आली आहे. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात बत्तीस जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या पोटनिवडणुका जाहीर, ५ ऑक्टोबरला मतदान

**दै.रायगड नगरी । मुंबई**

धुळे, नंदुरबार, अकोला, वाशीम व नागपूर जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या पोटनिवडणुका येत्या ५ ऑक्टोबर २०२१ रोजी घेण्यात येत आहेत. याबरोबरच पालघर जिल्हा परिषदेच्या व त्याअंतर्गत येणाऱ्या रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांसाठीदेखील त्याच दिवशी मतदान होईल आणि सर्व ठिकाणी ६ ऑक्टोबर २०२१ रोजी मतमोजणी होईल, अशी घोषणा राज्य निवडणूक आयुक्त यू. पी. एस. मदान यांनी आज केली.

मदान यांनी निवडणूक कार्यक्रमाबाबत सांगितले की, धुळे, नंदुरबार, अकोला, वाशीम आणि नागपूर या ५ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांमधील रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांसाठी १९ जुलै २०२१ रोजी मतदान होणार होते; परंतु सर्वो च्च न्यायालयाचे ६ जुलै २०२१ रोजी दिलेले आदेश आणि राज्य शासनाने कोविड-१९ मुळे पोटनिवडणुका स्थगित करण्याबाबत केलेली विनंती लक्षात घेऊन राज्य निवडणूक आयोगाने या निवडणुका ९ जुलै २०२१ रोजी आहे त्या टप्प्यावर स्थगित केल्या होत्या.

या प्रकरणी ९ सप्टेंबर २०२१ रोजी झालेल्या सुनावणीत मात्र सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासनाचे ११ ऑगस्ट २०२१ रोजीचे कोविड-१९ संदर्भातील निर्बंध पोटनिवडणुकांसाठी लागू होत नसल्याचा निर्णय दिला आहे; तसेच पोटनिवडणुकांचा कार्यक्रम पुढे चालू ठेवण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाने तात्काळ निर्णय घेण्याबाबतही आदेश दिले आहेत. हे आदेश आणि कोरोना रुग्णांची संख्या लक्षात घेवून राज्य निवडणूक आयोगाने आता पोटनिवडणुकांचा कार्यक्रम पूर्ण करण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्य निवडणूक आयोगाने धुळे, नंदुरबार, अकोला, वाशीम आणि नागपूरसह पालघरच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून कोरोना रुग्णांची संख्या व आठवडाभरातील दैनंदिन व मृतांच्या संख्येबाबत अहवाल मागविला होता. त्यावरून या सहा जिल्ह्यांतील कोरोना परिस्थिती आटोक्यात असल्याचे दिसून आले. धुळे, नंदुरबार, अकोला, वाशीम आणि नागपूरच्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या पोटनिवडणुकांसाठी २२ जून २०२१ रोजी जाहीर केलेल्या कार्यक्रमात पालघर जिल्हा परिषद व त्यांतर्गतच्या पंचायत समित्यांच्या पोटनिवडणुकांचा समावेश करण्यात आलेला नव्हता. कारण त्यावेळी कोविड-१९ संदर्भातील राज्य शासनाच्या निकषानुसार पालघर जिल्ह्याचा समावेश स्तर-३ मध्ये होता. त्यामुळे तेथील पोटनिवडणुका जाहीर केलेल्या नव्हत्या. आता मात्र या सर्व निवडणुकांची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे, असे

.../२

# नारायण राणे रायगड पोलिसांसमोर हजर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**




न्यायालयाच्या आदेशानुसार केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी आज रायगड पोलिसांकडे हजेरी लावली. पोलिसांनी त्यांचा जबाब नोंदवून घेतला मात्र त्यांचे कोणतेही व्हॉईस सॅम्पल घेतले नाही.

जन आशिर्वाद यात्रेदरम्यान महाड येथे राणे यांनी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्याबाबत आक्षेपार्ह विधान केले होते. राणे यांना महाड पोलिसांनी अटक करुन न्यायालयात हजर केले होते. त्यांनतर न्यायालयाने राणे यांना काही अटी, शर्तीवर जामिन मंजूर केला होता. ३० ऑगस्ट आणि १३ सप्टेंबर अशा दोन दिवस राणे यांनी रायगडच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागात हजेरी लावावी असे आदेश न्यायालयाने दिले होते. ३० ऑगस्ट रोजी प्रकृती ठिक नसल्याचा अर्ज राणे यांच्या वकीलांनी रायगड पोलिसांना देत राणे गैहजर राहीले होते. १३ सप्टेंबरला राणे हजेरी लावणार की नाही याकडे सर्वांचेच लक्ष लागले होते.

केंद्रीय मंत्री राणे हे जुहू येथील निवास्थ-ानातून सोमवारी दुपारी १२ वाजता अलिबागकडे रवाना झाले. दुपारी ठिक आडीच वाजता जिल्हा पोलिस अधिक्षकांच्या कार्यालयात हजर झाले. अवघ्या १५ मिनीटांतच पोलिसांनी त्यांची हजेरी घेत जबाब नोंदवला. त्यानंतर राणे बाहेर पडले.

## संक्षिप्त...

### दीपिका आणि रणवीर झाले अलिबागकर




**दै.रायगड नगरी । अलिबाग**

अलिबाग हे आता सेलिब्रिटींचे शहर म्हणून ओळखले जाणार आहे. अलिबाग आणि परिसरामध्ये अनेक कलाकारांचे मोठे आलिशान बंगले, फार्म हाऊस आहेत. आता यामध्ये आणखी एक सेलिब्रिटी कपलची भर पडली आहे. हिंदी सिनेसृष्टीतील सर्वात लोकप्रिय जोडी असलेल्या दीपिका पादुकोण आणि रणवीर सिंग ने अलिबागमधील मापगाव येथे ९० गुंठे जागा विकत घेतली आहे. ही जागा त्यांनी सुमारे २२ कोटी रुपयांना विकत घेतली असून त्या जागेच्या नोंदणीसाठी हे दोघे सोमवारी अलिबाग येथील नोंदणी कार्यालयात गेले होते.

दीपिका आणि रणवीरने विकत घेतलेल्या जागेच्या नोंदणीसाठी अलिबागमधील मुख्यालय दुय्यम निबंधक नोंदणी कार्यालयात गेले होते. या दोघांना पाहण्यासाठी नागरिकांनी एकच गर्दी केली होती. या दोघांचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

दरम्यान, नोंदणी कार्यालयातून बाहेर पडणाऱ्या रणवीरने डोळ्यांवर गॉगल लावला होता आणि त्याने आपला संपूर्ण चेहरा झाकला होता. तर दीपिकाने ही चेहऱ्यावर मास्क लावला होता. कार्यालयातून बाहेर पडताना रणवीरने दीपिकाचा हात हातात घेतला होता. त्यानंतर हे दोघेजण त्यांच्या गाडीत बसले. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार दीपिका आणि रणवीरने अलिबागमध्ये विकत घेतलेल्या या जागेत दोन आलिशान बंगले असून, नारळ आणि सुपारीच्या तयार बागा देखील आहेत.

# रोह्यात पारंपरिक पद्धतीने गौराईचे पूजन



**दै.रायगड नगरी । धाटाव**

रोह्यात गौराईचे काल जल्लोषात आगमन झाल्यानंतर आज पारंपरिक पद्धतीने मनोभावे पूजन करण्यासाठी महिला वर्गाची चांगलीच लगबग पहावयास मिळाली.

नवनवीन विविध रंगाच्या साड्या परिधान करून आज गौराईचे पूजन करताना एकत्र सुहासिनिचे वाण घेण्यात महिलांचा चांगलाच उत्साह पहावयास मिळाला.

कोकणात होळी सणाबरोबर गौरी, गणपती सणाला अनन्य साधारण महत्व आहे.गणपती सणात पूजा आर्चा, आरती बरोबर नैवेद्य आणि रात्री पारंपारिक पद्धतीची जुनी गाणी म्हणत जागरण अशा सर्व बाबीत हा सण मोठ्या उत्साहाने साजरा होत असतो. गणरायाच्या आगमना बरोबर काल गौराईचे आगमन झाल्या नंतर आज सकाळ पासून गौरीचे पूजन करण्यासाठी विविध फुलांनी सजावट करून पूजनासाठी महिलांची लगबग पाहण्याजोग होती. आपल्या घरात सुख, समृध्दी नांदावी यासाठी गौराईचा ओवसा सुहासिनीनी (वाण) घेतले.

दरम्यान जुन्या जाणकार जेष्ठ महिलानी आपल्या सुरेल आणि संगीतमय गाणी बोलून गौराईचे स्वागत आणि पूजन करण्यासाठी मार्गदर्शन केले. तर यांप्रसंगी नवविवाहित दाम्पत्यांनी आपल्या नातेवाईक, सगे सोयरे मंडळी कडे जावून सुहासिनीचे वाण घेतले. एकंदरीत या पारंपारिक पद्धतीने झालेल्या मोठ्या आनंदमय वातावरणात असंख्य महिला वर्गानी आपला आनंद द्विगुणत केल्याचे पहावयास मिळाले.

# पेणमध्ये १ लाखांच्या वर नागरिकांचे लसीकरण ; गरोदर व स्तनदा मातांनाही लस

**दै.रायगड नगरी । पेण**

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे गेली दोन वर्षांपासून जगात हाहाकार उडाला आहे. महाराष्ट्रात दिवसेंदिवस वाढते रुग्ण आणि मृत्युचे प्रमाण रोखण्यासाठी केंद्र शासनाने कोरोना प्रतिबंध लसीकरणाला सुरूवात केली आहे. यामध्ये कोव्हिशिल्ड आणि कोवॅक्शीन या दोन लस दोन टप्प्यात देण्यात आल्या आहेत.



महाराष्ट्रातील नागरीकांनी लसीकरणाचा चांगला प्रतिसाद दिला असून पेण मध्ये सुद्धा आतापर्यंत १ लाखांच्या वर नागरीकांचे लसीकरण झाले आहे. यामध्ये सरूवातीला ४५ वर्षांवरील नागरीकांना प्रथम लस देण्यात आली. त्यानंतर १८ वर्षांवरील नागरिकांचेही लसीकरण करण्यात येऊ लागले. यासह तालुक्यातील गरोदर व स्तनदा मातांनाही प्रथम लस देण्यात येत असल्याची माहिती तालुका आरोग्य अधिकारी यांनी दिली आहे.

पेण शहरातील ४५ ते १८ वर्षांवरील १६३७३ नागरीकांना कोव्हिशिल्डचा आणि १०३१६ नागरिकांना कोवॅक्शिनचा पहिला आणि दुसरा डोस देण्यात आला असून आतापर्यंत एकूण २६६८९ नागरिकांचे लसीकरण करण्यात आले आहे. तर पेण तालुक्यातील गडब, वाशी, जिते, कामार्ली या आरोग्य उपकेद्रांवर ६७५५१ जणांना कोव्हिशिल्ड आणि ७११३ नागरिकांना कोवॅक्शिनचे दोन डोस देण्यात आल्याने एकुण ७४६६४ जणांचे लसीकरण झाले आहेत. त्यामुळे आतापर्यंत पेण शहरासह तालुक्यातील जवळपास १ लाख १३ हजार ५३ जणांचे कोव्हिशिल्ड आणि कोवॅक्शिनचे दोन्ही डोस देण्यात आले आहेत.

तर तालुक्यातील गरोदर आणि स्तनदा मातांनाही कोरोना प्रतिबंधात्मक उपाय म्हणून एकूण ६४ महिलांचे लसीकरण केले आहे. तालुक्यातील जेष्ठ नागरिक, महिला तसेच १८ वर्षांवरील नागरिकांनी लसीकरणाला चांगला प्रतिसाद दिला असून जास्तीत जास्त लसीकरण करून नागरिकांनी कोरोनाच्या नियमांचे सुध्दा काटेकोरपणे पालन करावे असे आवाहन तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.अपर्णा खेडेकर यांनी केले आहे.

# लाचखोरीचे सत्र सुरूच ; आणखीन एक अभियंता लाचप्रकरणी एसीबीच्या जाळयात

**दै.रायगड नगरी । कल्याण**

कल्याणचे तहसिलदार, केडीएमसीचा कनिष्ठ अभियंता असे अधिकारी एका पाठोपाठ लाचेच्या हव्यासापोटी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात अडकल्याच्या घटना नुकत्याच घडल्या असताना ला-चखोरीचे सत्र अद्याप सुरूच असल्याचे सोमवारी झालेल्या आणखीन एका कारवाईतून समोर आले आहे. कल्याण सार्वजनिक बांधकाम विभागातील शाखा अभियंता अविनाश पांडुरंग भानुशाली यांना कार्यालयातच १ लाख रूपयाची लाच घेताना रंगेहाथ अटक करण्यात आली. ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ही कारवाई केली.

मुंबई वडोदरा द्रुतगती महामार्गाच्या निर्मितीसाठी भुसंपादनाचे काम सध्या कल्याण तालुक्यात सुरू आहे. या महामार्गात बाधित होणा-या जमिनींचे मुल्यमापन करून अहवाल देण्याचे कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून केली जात आहे. दरम्यान अहवाल देण्यासाठी कल्याण सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंता भानुशाली यांनी अह-वाल देण्यासाठी तक्रारदार बांधकाम बाधिताकडून ९ सप्टेंबरला पडताळणी दरम्यान चार लाख रूपये लाचेच्या स्वरूपात स्विकारले.

दरम्यान आणखीन १ लाख रूपये दिल्याशिवाय अहवाल मिळणार नाही असे भानुशाली यांनी संबंधित बाधिताला सांगितले. अखेर याची तक्रार ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे करण्यात आली.

तक्रारीची खातरजमा करून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलिसांनी कल्याण शासकीय विश्रमगृहाच्या आवारात असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात सापळा लावला आणि १ लाखांची रोकड स्विकारणा-या भानुशाली यांना रंगेहाथ अटक केली. महामार्गाच्या बांधणीत बाधित होणा-यांना योग्य तो मोबदला मिळत नाही असे आरोप, तक्रारी सर्रासपणो होत असताना दुसरीकडे मुल्यमापनाचा अहवाल देण्यासाठी बाधितांकडून ला-चेची मागणी करण्याची अधिका-याची कृती चर्चेचा विषय ठरली आहे.

### राज्य उत्पादन शुल्क विभाग रायगड-ठाणे पथकाची संयुक्त कारवाई

# २ लाख ६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे राज्य आयुक्त कांतीलाल उमाप यांच्या आदेशानुसार कोकण विभाग ठाणे चे विभागीय उपायुक्त सुनील चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली अधीक्षक श्रीमती किर्ती शेडगे, ठाणे उपअधीक्षक चारुदत्त हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली दि.११ व १२ सप्टेंबर २०२१ रोजी रोहा तालुक्यातील गोपाळवठ धनगरवाडी, कारवीने धनगरवाडी व कारवीने ठाकूरवाडी येथील अवैध हातभट्टी निर्मिती केंद्रावर रायगड व ठाणे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकारी- कर्मचाऱ्यांनी केलेल्या संयुक्त कारवाईत तब्बल २ लाख ६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या धाडीदरम्यान एकूण सहा गुन्हे दाखल झाले असून त्यापैकी एक वारस तर ५ बेवारस गुन्हे असून एक आरोपी ताब्यात घेतला आहे. तसेच ८० लिटर हातभट्टी दारू आणि सात हजार ४०० लिटर रसायनही जप्त करण्यात



आले आहे, अशी माहिती आनंद अं.पवार, निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, मुरुड विभाग यांनी दिली आहे.

# महिला सुरक्षेचे धिंडवडे

महाराष्ट्र गेल्या काही दिवसांमधल्या महिलांवरील अमानुष अत्याचारांनी हादरून गेला आहे. मुंबई, पुणे, कल्याण, वसई, अमरावती, पिंपरी-चिंचवड, उल्हासनगर.. अशा सगळ्या ठिकाणांहून बलात्काराच्या घटनांच्या संतापजनक बातम्या येत आहेत. या अत्याचारांना बळी पडलेल्या अल्पवयीन मुली आहेत. प्रवासातल्या तरुणी आहेत. गृहिणी आहेत आणि घर सोडलेल्या युवतीही आहेत. मुंबईत साकीनाका परिसरात पहाटे अत्याचार करून या पीडित महिलेचा क्रूरपणे खून करण्याची घटना तर अंगावर शहारे आणणारी आहे. महाराष्ट्रातील कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंडवडे अजून काय निघायचे राहिले आहेत? या नृशंस गुन्ह्यांची नैतिक जबाबदारी घेण्यास सत्ताधारी आघाडीतील तीन पक्षांचे नेते, मंत्री, नोकरशहा किंवा वरिष्ठ पोलिस अधिकारी यातले कुणीही पुढे येणार नाही. याचे कारण त्यांचे प्राधान्यक्रमच वेगळे आहेत आणि त्यात महाराष्ट्रातील महिलांच्या संरक्षणाचा मुद्दा येत नाही. काही दिवसांपूर्वी पुणे स्टेशनवर मदतीची तयारी दाखवून अपहरण केलेल्या युवतीवर दोन दिवसांमध्ये बारा-तेरा जणांनी अत्याचार केल्याचे समोर येते आहे. पोलिसांना एक मुलगी स्टेशनवरून दोन दोन दिवस गायब झाल्याचे समजूही नये, इतके पोलिसांचे खबऱ्यांचे जाळे विसविशीत झाले आहे का? कायद्याचे राज्य ही अमूर्त संकल्पना असते. कायद्याचे राखणदार अशा पोलिसांनी ती प्रत्यक्षात आणायची असते. संभाव्य गुन्हेगारांना वाटणारी पोलिसांची भीती आणि दहशत ही गुन्हे रोखणारी खरी शक्ती असते. पोलिसांची अशी थोडी जरी भीती मनाच्या तळात असती तरी साकीनाका परिसरात पहाटे अत्याचार करून या महिलेचे निर्घृणपणे प्राण घेण्यास हा नराधम धजला नसता. महाराष्ट्रात अशा घटना का वाढत आहेत, याचे आत्मपरीक्षण पोलिस दलच नव्हे तर नोकरशाही आणि सरकारनेही करण्याची गरज आहे. ज्या पोलिस दलात खाकी गणवेश घालणारे अधिकारीच मवाली, गुंड आणि खुनी असल्याचे आरोप होतात, त्यातल्या अनेकांना अटक होते; त्या पोलिस दलाचे नीतिधैर्य किती खच्ची झाले असेल, याची कल्पना करता येत नाही. माजी गृहमंत्री बेपत्ता आणि आजी गृहमंत्री मिठाची गुळणी धरून मौनात असल्यानंतर; गुन्हेगारांच्या मुसक्या बांधण्यासाठी पोलिस दलाला आवश्यक ते पाठबळ आणि प्रामाणिक अधिकाऱ्यांना खमका पाठिंबा देणार तरी कोण? साकीनाका बलात्कार आणि खून प्रकरणातील आरोपी सापडला आहे. त्याच्यावर जलदगती न्यायालयात खटला चालवू, असे मुख्यमंत्री सांगत आहेत. मात्र, जनतेचा संताप झाला की, तात्पुरती उपाययोजना करण्यापेक्षा महिलांना समाजात वावरताना कायम सुरक्षित वाटेल, अशी व्यवस्था का केली जात नाही? मुंबई हे एकेकाळी महिलांसाठी अत्यंत सुरक्षित शहर मानले जाई. कामावरून उशिराही घरी परतणाऱ्या महिला मनोमन निश्चिंत असत. आज तशी स्थिती आहे का? लोकलच्या फेऱ्या कमी असूनही महिलांवर दागिने चोरण्यासाठी प्राणघातक हल्ले होत आहेत. अनिल देशमुख गृहमंत्री असताना महिला व मुलांवर अत्याचार झाल्यास कठोर शिक्षेची तरतूद असणाऱ्या 'शक्ती कायद्या'चे प्रारूप मंत्रिमंडळाने मंजूर केले. या प्रस्तावित कायद्याचे पुढे काय झाले? हा कायदा गेली दोन अधिवेशने नेमका का रखडतो आहे, याचे प्रामाणिक उत्तर राज्य सरकारने महाराष्ट्राला द्यावे. अर्थात, प्रश्न केवळ कठोर आणि कडक कायद्यांचा नसतो. समाजात कायद्याचा सन्मान होण्याचे, महिलांना आदराने वागविले जाण्याचे आणि त्यांचा मान राखला जाण्याचे वातावरण लागते. गेल्या काही दिवसांत अनेक मंत्री, नेत्यांवर महिलांच्या संबंधात होणारे आरोप आठवून पाहावेत. एक तरुणी आत्महत्या करते, दुसरीला तक्रार करते म्हणून कोठडीत डांबले जाते, तिसरीच्या गाडीत पिस्तुल टाकले जाते. हे काय चालले आहे? इतरही उदाहरणे आहेत. या साऱ्यांतून महिलांच्या सन्मानाबद्दल समाजाचे नेतृत्वच संवेदनशील नाही, असा संदेश जातो. त्यातून, महिलांबद्दलचे वागणे अधिकाधिक अनुदार, क्रूर आणि बेमुर्वत होत जाते. गेल्या दोन दिवसांत विविध नेते परस्परांना जी दूषणे देत आहेत, ती तर घृणा आणणारी आहेत. 'वाचाळांनो, तुम्ही सगळे एकाच माळेचे मणी आहात,' हे यांना कुणीतरी सांगायला हवे. विधिमंडळात महिलांबद्दलच्या गंभीर गुन्ह्यांची जी वार्षिक आकडेवारी सादर होते; तिच्यातील वाढ क्लेशदायक आहे. गेल्या काही दिवसांत नागपूरपासून मुंबईपर्यंत बलात्काराच्या किमान नऊ गंभीर तक्रारी दाखल झाल्या. त्यात अत्याचारांना बळी पडलेल्या अल्पवयीन, निराधार, मतिमंद मुलींपासून एकाकी महिलांपर्यंत साऱ्या आहेत. यातले अनेक सामूहिक बलात्कार आहेत. कायद्याची भीती संपते; तेव्हाच असे सामूहिक गुन्हे होतात. साकीनाका येथील अत्याचार व खुनाने तर या नराधमांच्या नीचपणाचा तळ गाठला. इतके होऊनही ठाकरे सरकार हातावर हात बांधून पोकळ उपदेशांचे डोस पाजणार, का राज्यभरातल्या 'सर्व गुन्हेगारांच्या' मुसक्या आवळण्याची हिंमत दाखविणार?

# पोलादपूर तालुक्यातील धामणदिवी ग्रामपंचायत कार्यालयाचे नगराध्यक्षा स्नेहल जगताप यांच्या हस्ते उदघाटन



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

स्व.माणिकराव जगताप यांच्या पश्चात पोलादपूर तालुक्यातील विविध विकासकामांची पूर्तता करण्यासाठी प्रयत्नशील राहू, तालुक्यातील मतदारजनता तसेच स्व.माणिकरावांच्या प्रशंसकांना साथ देऊ, अशी ग्वाही महाडच्या नगराध्यक्षा तथा प्रदेश काँग्रेस सचिव स्नेहल माणिक जगताप यांनी येथे दिली.

तालुक्यातील काँग्रेस पक्षाच्या अधिपत्याखालील एकम `वाद्वितीय असलेल्या धामणदिवी ग्रामपंचायतीच्या कार्यालयाचे उदघाटन तसेच स्व.माणिक जगताप सभागृह आणि स्मशानशेडचे उदघाटन महाडच्या नगराध्यक्षा तथा प्रदेश काँग्रेस सचिव स्नेहल माणिक जगताप यांच्याहस्ते करण्यात आले. या विकास कामांची पूर्तता माजी आमदार स्व.माणिकराव जगताप यांच्या प्रयत्नांतून झाली आहे.

यावेळी महाड विधानसभा काँग्रेसचे नेते हनुमंत जगताप, तालुका काँग्रेसचे अध्यक्ष अजय सलागरे, महाड तालुका काँग्रेसचे अध्यक्ष राजुशेठ कोरपे, उपसभापती शैलेश सलागरे, माजी सभापती आणि माजी सभापती व पं.स. सदस्य दिपीका दरेकर, माजी सभापती दिलीप भागवत, कृष्णा कदम, मोहन शिंदे, तालुका युवक काँग्रेसचे अध्यक्ष प्रवीण महाडिक, शहर अध्यक्ष अमोल भुवड, तालुका सरचिटणीस योगेश शिंदे, विभाग अध्यक्ष नामदेव शिंदे, प्रदीप नरे, साईनाथ शिंदे, कमलाकर पार्टे, महेश दरेकर, अशोक साळुंखे तसेच बांधकामाचे ठेकेदार आणि काँग्रेसचे पुणे येथील युवा कार्यकर्ते सचिन पार्टे, वैभव जाधव, तंटामुक्ती अध्यक्ष बळीराम चव्हाण, पुणे मंडळ अध्यक्ष अशोक कदम, धामणदिवीचे सरपंच शांताराम पारदुले व अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी अजय सलागरे, दिलीप भागवत, शैलेश सलागरे,दीपिका दरेकर, शांताराम पारदुले,इत्यादी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी धामणदिवीतील माजी सरपंच, ग्रामस्थ तसेच महिला मंडळ आणि कुणबी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# २५ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

## ऑनलाईन किंवा प्रत्यक्ष चर्चा करून समोपचाराने प्रकरणे मिटवण्याची संधी

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

महाराष्ट्र राज्य विधीसेवा प्राधिकरण, मुंबई तसेच ठाणे जिल्हा विधीसेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार शुक्रवार दि.२५ सप्टेंबर २०२१ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन तालुका विधी सेवा समिती, वाशी, नवी मुंबई येथे करण्यात आले आहे. या लोक अदालतीमध्ये दिवाणी, फौजदारी, वैवाहिक स्वरुपाची, तसेच १३८ एन.आय.क्ट खाली चेक संबंधीची दाखल झालेली, बँक वसुली, सुसंवादन, महानगरपालिका कर संबंधीची दाखलपूर्व प्रकरणे निकाली काढण्यात येणार आहेत. या लोक अदालतीमध्ये वादपूर्व प्रकरणांचा बँक, पतसंस्था, वीजमंडळ, इंटरनेट, फोन व मोबाईल संस्था यांनी भाग घेऊन ते ग्राहकांसोबत होणारे वाद संपुष्टात आणू शकतील. यासाठी त्यांना कोणतेही न्यायालीन किंवा इतर शुल्क देण्याची आवश्यकता नाही. तसेच ग्राहक देखील त्यांची बाजू मांडून थकीत बीले नियमित करून घेऊ शकतात.

या लोकअदालतीमध्ये जे पक्षकार हजर राहू शकत नाहीत त्यांच्याकरीता ऑनलाईन पध्दतीचा वापर करण्यात येत असून त्याकरीता पक्षकारांनी आपला मोबाईल क्रमांक तसेच ईमेल आयडी विधीतज्ञांमार्फत अथवा स्वत: उपस्थित राहून उपलब्ध करून द्यावा. लोकन्यायालयामध्ये दिवाणी स्वरुपाची तडजोडीस पात्र व दखलपूर्व जास्तीत जास्त प्रकरणे सामंजस्य आणि तडजोडीने निकाली काढण्याकरीता सर्वांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन करण्यात येत आहे.

कोविड-१९ सारख्या गंभर साथीच्या आजारात बरीच प्रकरणे प्रलंबित राहिली आहेत. त्यामुळे पक्षकांराना त्यांची प्रकरणे सामंजस्याने आणि तडजोडीने मिटविण्यासाठी प्रत्यक्ष संधीच या लोकन्यायालयाने उपलब्ध करून दिली आहे. दि.२२ ते २४ सप्टेंबर २०२१ पर्यंत पक्षकार व विधीज्ञ हे ऑनलाईन किंवा प्रत्यक्ष आपल्या प्रकरणातील समस्यांवर न्यायालयासमोर चर्चा करून सामोपचाराने प्रकरण मिटवू शकतात. म्हणजेच त्यांना केवळ दि.२५ सप्टेंबर २०२१ रोजीच्या दिवशी नव्हे, ती त्या दिवसापर्यंत चर्चेला वेळ मिळू शकेल.

त्याचप्रमाणे ज्या आरोपींचे गुन्हे तडजोडीपात्र आहेत त्यामध्ये फिर्यादी तडजोड करू शकतात. तसेच किरकोळ स्वरुपाचे गुन्हे आहेत त्यामध्ये आरोपीची इच्छा असल्यास आरोपी गुन्हा कबुली देऊन प्रकरणे निकाली काढू शकतात.

तरी सर्वांनी या लोकअदालतीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. यासाठी दि.२० सप्टेंबर २०२१ पर्यंत आपले तडजोडीचे अर्ज संबंधित न्यायालयात दाखल करावे, असे आवाहन श्रीम. टी.एम.देशमुख-नाईक, अध्यक्षा तालुका विधी सेवा समिती, वाशी, नवी मुंबई यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.


# उरण-पिरवाडी समुद्रकिनारी तरुणाईची साफसफाई

**दै.रायगड नगरी । उरण**

पर्यावरणाचे संरक्षण, संवर्धन, स्वच्छता विषयक जनजागृती करण्याच्या दृष्टीकोणातून सेव अवर बीच व क्रिएट टुगेदर फॉउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने उरण पिरवाडी समुद्र किनारी साफसफाई करण्यात आली.

यावेळी समुद्रातून वाहून आलेला नैसर्गिक कचरा, समुद्रकिनारी फिरायला आलेले पर्यटक यांनी टाकलेले प्लास्टिक पिशव्या, दारूच्या बाटल्या, विविध कागदी प्लास्टिक वस्तू आदी एकत्र गोळा करून त्याची विल्हेवाट लावण्यात आली.

सेव अवर बिचचे अमोल दुरुगकर, आर्यन घरत, भूमिका सिंग, शिवा म्हात्रे तसेच क्रीएॅट टूगेदर फॉउंडेशनचे दीपक विश्वकर्मा, रवी वर्मा, अभिषेक गुप्ता, असमान शेख, शोभना पिल्लई, शक्ती पिल्लई, हमीद शेख, प्राची फडके, सौरभ आदी सेव अवर बीच व क्रिएट टुगेदर फॉउंडेशनचे पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.स्वयंम स्फूर्तीने तरुणांनी केलेल्या या सामाजिक उपक्रमाचे विविध सामाजिक संस्था, संघटनांनी कौतुक केले आहे.



# नगरसेवक राजू सोनी यांच्या तत्परतेमुळे अंधारमय परिसराला मिळाला उजाळा



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील मनिष मार्केट ते बापटा वाडा परिसर काही तासांकरिता विद्युत पुरवठा खंडीत झाला होता. याबाबत स्थानिक रहिवाशांसह पत्रकार गणेश कोळी यांनी राजू सोनी यांच्याशी संपर्क साधून या असुविधेबाबत माहिती देताच तत्परतेने वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या साथीने अथक प्रयत्न करून या भागातील विद्युत पुरवठा सुरळीत करून दिला.

शहरातील मनिष मार्केट ते बापटवाडा या भागातील विद्युत पुरवठा रविवारी रात्री खंडीत झाला होता. वीज वितरण कंपनीशी संपर्क साधण्यात येत होता. परंतु हवा तसा अनुकूल प्रतिसाद स्थानिक रहिवाशांना मिळत नव्हता. याबाबत त्यांनी स्थानिक नगरसेवक राजू सोनी यांच्याशी संपर्क साधून त्यांना याबाबतची माहिती दिली. त्यांनी तात्काळ वीज वितरण कंपनीचे सहाय्यक अभियंता डी.के.मोरे, विकास कांबळे, विलास कांबळे, अर्जून डोंगरे, सुनील सानप, महेश खंडागळे, गौरव पाटील आदींशी संपर्क साधून येथील बिघाडाचा शोध घेतला असता तो उंच पोलवर व इतर वायरिंगशी संबंधित असल्याचे आढळून आले. त्यामुळे तेथे काम करण्यासाठी मोठे क्रेन उपलब्ध करून घेणे गरजेचे होते. तात्काळ राजू सोनी यांनी स्वखर्चाने मोठी क्रेन भाड्याने त्या ठिकाणी आणली व वीज वितरण कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मेहनत घेवून अनेक तासानंतर हा विद्युत पुरवठा पुवर्वत केला. राजू सोनी यांनी तत्परतेने धाव घेवून मदतीचा हात दिल्याबद्दल परिसरातील रहिवाशी, व्यापारी व नागरिकांनी त्यांचे आभार मानले आहेत.

# नागोठण्याच्या कु. मेघ पोटेने संगीत स्पर्धेत रोवला अटकेपार झेंडा

**दै.रायगड नगरी । वाकण**

नागोठणे शहरातील मराठा आळीतील रहिवासी, उत्तम बासरी वादक तसेच बासरी वाद्याचे निर्माते निलेश बाळाराम पोटे यांचे चिरंजीव कु.मेघ निलेश पोटे याने कोर इन्स्टिट्युट ऑफ म्युझिक, कॅनडा आयोजित आंतरराष्ट्रीय ऑनलाईन संगीत स्पर्धेत भारत देशाचे प्रतिनिधित्व करतांना तब्बल २०० स्पर्धकांधून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले आहे. अशाप्रकारे कु. मेघ पोटे याने आंतरराष्ट्रीय संगीत स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवित आपल्या नागोठणे गावाचा झेंडा अटकेपार रोवला आहे. या यशाबद्दल कु. मेघ पोटे याच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

अशाप्रकारे आपल्या नागोठणे गावाचे नाव आंतरराष्ट्रीय संगीत स्पर्धेत नावलौकिक करण्याची गौरवास्पद कामगिरी कु. मेघ पोटे याने केली आहे. त्याच्या या यशाबद्दल रायगड जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार सुनील तटकरे यांच्या आशिर्वादाने तसेच रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री कु.आदिती ताई तटकरे व आमदार अनिकेत भाई तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या वतीने नुकताच कु. मेघ पोटे याचा त्याच्या घरी जाऊन सन्मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन व सत्कार करण्यात आला व त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

पृष्ठ क्र.१ वरुन...

# जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या पोटनिवडणुका जाहीर

मदान म्हणाले. पालघर जिल्हा परिषद व त्यांतर्गतच्या पंचायत समित्यांच्या पोटनिवडणुकांसाठी १५ सप्टेंबर ते २० सप्टेंबर २०२१ या कालावधीत नामनिर्देशनपत्रे दाखल करता येतील. २१ सप्टेंबर २०२१ रोजी नामनिर्देशनपत्रांची छाननी होईल. पुढील टप्पे धुळे, नंदुरबार, अकोला, वाशीम आणि नागपूरच्या जिल्हा परिषदा व त्याअंतर्गतच्या पंचायत समित्यांच्या पोटनिवडणुकांसोबत होतील. कारण या पाच जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या पोटनिवडणुकांचा कार्यक्रम छाननीनंतर स्थगित करण्यात आला होता. आता पालघरसह सर्व ठिकाणी २१ सप्टेंबर २०२१ रोजी वैध उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

नामनिर्देशनपत्रासंदर्भात निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या निर्णयाविरूद्ध जिल्हा न्यायालयात अपील नसलेल्या ठिकाणी २७ सप्टेंबर २०२१ रोजी नामनिर्देशनपत्रे मागे घेता येतील. अपील असलेल्या ठिकाणी २९ सप्टेंबर २०२१ पर्यंत नामनिर्देशनपत्र मागे घेता येतील. ५ ऑक्टोबर २०२१ रोजी मतदान; तर ६ ऑक्टोबर २०२१ रोजी मतमोजणी होईल. जिल्हा परिषदेच्या एकूण ८५ निवडणूक विभाग आणि पंचायत समितीच्या एकूण १४४ निर्वाचक गणांच्या पोटनिवडणुकांसाठी हे मतदान होईल. त्यासाठी कोरोना संदर्भातील आवश्यक ते सर्व प्रतिबंधात्मक उपाय योजून दक्षता घेण्यात यावी, असे निर्देशही देण्यात आले असल्याचे मदान यांनी सांगितले.


# ग्रुप ग्रामपंचायत चाणजे

ता.उरण, जि.रायगड

## जाहीर निविदा

ग्रुप ग्रामपंचायत चाणजे ता. उरण यांजकडून जाहीर निविदा कळविण्यात येते की, खालील काम सिडको अंतर्गत ग्रामपंचायतीमार्फत करण्यात येणार असून शासनाच्या योग्य त्या नोंदणीकृत ठेकेदाराकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहे. तरी खालील कामांचे कोष्टकात नमूद केल्याप्रमाणे इच्छुक ठेकेदाराने मोहोरबंद निविदा सादर करण्यात याव्यात.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | १% इसारा रक्कम | निविदा फी | निविदा फॉर्म मिळण्याचे | | निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख | काम पूर्ण करण्याची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ठिकाण | दिनांक | | |
| १ | ग्रामपंचायत चाणजे मधील तेलीपाडा येथील गणपती विसर्जन तलावाचे दुरुस्तीकरण व काटेरी कुंपणाचे बांधकाम करणे. | ७,६४,६००/- | ७६४६ | २००० | ग्रा.पं. कार्यालय | १५/९/२०२१ ते २१/९/२०२१ दुपारी २.०० वाजेपर्यंत | २१/०९/२०२१ कार्यालयीन वेळेतपर्यंत | ६ महिने |

अटी व शर्ती :

१) निविदा मंजूर झालेल्या ठेकेदारास काम करण्यासाठी कोणत्याही प्रकारे ॲडव्हान्स रक्कम दिली जाणार नाही.

२) ठेकेदार हा शासकीय नोंदणीकृत ठेकेदार असणे बंधनकारक आहे.

३) निविदा फॉर्म घेतेवेळी मुळ नोंदणीपत्र व आयकर दाखला जी.एस.टी. नंबर ॲक्टीव दिल्यानंतरच निविदा फॉर्म दिला जाईल.

४) कामाचे मुल्यांकन सिडको कार्यकारी अभियंता (द्रोणागिरी-१) यांच्याकडून केले जाईल.

५) ठेकेदाराने कामाकरिता वापरात आणणारे सिमेंट, रेती, खडी इत्यादींची गुणवत्ता प्रयोग शाळेत तपासून त्याचा अहवाल कार्यकारी अभियंता (द्रोणागिरी-१) यांच्याकडे देणेचा आहे. मान्यता प्राप्त साहित्य बनविणाऱ्यांची यादी सिडकोच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

६) ठेकेदाराने काम करतेवेळी सदरील काम पी.डब्ल्यू.डी विभागातर्फे प्रकाशित केलेले रेड बुक नुसार निर्देशित केलेल्या तपशिलाप्रमाणे करावयाचे आहे.

७) अनुदान तीन हप्त्यात कामाच्या दर्जानुसार सिडको कार्यालयाकडून कामाची पाहणी करून त्यानुसार प्राप्त अनुदान खालील मार्गदर्शक सुचनेनुसार अदा करण्यात येईल.

अ. पहिला हप्ता : कामाच्या खर्चाच्या ३० टक्के काम पुर्ण झाल्यावर

ब. दुसरा हप्ता : कामाच्या खर्चाच्या ६० टक्के काम पुर्ण झाल्यावर

क. तिसरा हप्ता : कामाच्या खर्चाच्या १०० टक्के काम पुर्ण झाल्यावर

८) निविदा मंजूर झालेल्या ठेकेदाराने रुपये ५०० च्या बॉन्ड पेपरवर करारनामा लिहून देणे बंधनकारक राहील.

९) निविदा मंजूर झाल्यानंतर संबंधित ठेकेदाराने १५ दिवसांत काम सुरू करावयाचे आाहे.

१०) निविदे बरोबर इसारा रक्कम भरणा केलेली पावती जोडणे आवश्यक आहे. अन्यथा निविदा बाद करण्यात येईल.

११) कामाचे टप्प्यानुसार कामाचे फोटो (४'' × ६'' साईजमध्ये) काढून तीन प्रतीमध्ये सिडको कार्यालयात तसेच ग्रामपंचायत कार्यालयात देणे बंधनकारक आहे. तसेच कामाच्या मोजमापाचा अहवाल तारखेसहीत तयार करुन देणे बंधनकारक आहे.

१२) कामाच्या हद्दीत खारफुटीच्या झाडांना काहीही अपाय न होता ते काम करण्यासाठी लागणारी परवानगी वनविभागाकडून आणण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१३) निविदा उघडण्याची तारीख दि.२२/०९/२०२१ रोजी दुपारी ११ वाजता ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय

१४) कोणतीही निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत चाणजे**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत चाणजे**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com



पनवेल तालुक्यातील कोंडले येथील रवींद्र पाटील यांच्या निवासस्थानी विराजमान झालेले श्री गणराज



पत्रकार नारायण सावंत, मु.पोयरे,( गोंदापुरवाडी), ता. देवगड, जिल्हा सिंधुदुर्ग, याच्या घरी विराजमान झालेले लाडके गणराया



अथर्व संभाजी वंजारे (आवळदेवाडी मसदे) यांच्या निवासस्थानी प्रतिष्ठापना करण्यात आलेले श्री गणेश



पालेबुद्रुक, पनवेल येथील नाथा बळीराम उलवेकर यांच्या निवासस्थानी विराजमान झालेले श्रीगणराज



शिरढोण, पनवेल येथील अंबाजी मुकादम यांच्या निवासस्थानी विराजमान झालेले श्रीगणराज



पुनाडे उरण येथील विष्णू सखाराम पाटील यांच्या निवासस्थानी विराजमान झालेले श्रीगणराज



श्रीवर्धन येथील निखिल भुसाणे यांचे निवासस्थानी विराजमान श्री गणराज



कराडे, पनवेल येथील योगेश पाटील यांच्या निवासस्थानी विराजमान झालेले श्रीगणराज



रसायनीतील पत्रकार राकेश खराडे यांच्या घरी विराजमान आकर्षक श्रीगणेशमुर्ती



मुरुड तालुका पं.स.चे मा.सभापती चंद्रकांत कमाने यांच्या निवासस्थानी स्थानापन्न झालेले गणरात



पनवेल येथील रामदास शेडगे यांच्या निवासस्थानी विराजमान झालेले श्री गणराज



मुरुडमधील सुधीर पाटील यांच्या निवासस्थानी साकारलेली लोभस गणेशमुर्ती. (छाया : नितीन शेडगे, मुरुड)



म्हसळा येथील दिपक करंबे यांचे निवासस्थानी विराजमान श्री गणराज



पनवेल भिंगारी येथील भिमराव कांबळे यांच्या निवासस्थानी विराजमान झालेले श्री गणराज



विक्रात युवक मंडळ इंदिरा गांधी नगर माथेरान ३८ व्या वर्षात पदार्पण करत यांनी कोरोना संदर्भात उत्कृष्ट सजावट साकारली होती. (छाया : मुकूंद रांजाणे, माथेरान)

# मुरुड तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानासाठी भरीव आर्थिक मदत जाहिर करा

## ॲड.प्रविण ठाकूर यांची मदत पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांना मुरूडचा दौरा करण्याची विनंती

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

रायगड जिल्हयातील मुरुड तालुक्यामधील बोर्ली,मांडला, येसदे, साळाव, सुरई, मजगांव,नांदगाव परिसरात अतिवृष्टीमुळे उडालेल्या हाहाकाराने या परिसरातील ग्रामस्थांचे प्रचंड नुकसान झाले आहे. राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री व काँग्रेस पक्षाचे नेते म्हणून मंत्री विजय वडेट्टीवार यांनी या विभागाचा दौरा करावा. अशी विंनती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव ॲड.प्रविण ठाकूर यांची मदत पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांना केली आहे.

ॲड.प्रविण ठाकूर यांनी पत्रामध्ये दिनांक ६ सप्टेंबर २०२१ रोजी रायगड जिल्हयातील मुरुड तालुक्याला मुसळधार पावसाने झोडपून काडले. गेल्या महिन्याभरात दुस–यांना हा कठीण प्रसंग मुरूड तालुक्यातील जनतेवर ओढावला आहे. दिनांक ७ सप्टेंबर २०२१ रोजी मी स्वतः या भागाची भेट देवून पहाणी केली असता लोकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. घरेदारे चिखलाने भरून गेली आहेत. गोरगरिबांना गणेशोत्सवाच्या तोंडावरच हा धक्का बसला आहे. सलग १२ तासांहून अधिक काळ पडणाऱ्या पावसामुळे गारंबी व खार अंबोली धरणाच्या पाण्यात मोठी वाढ झाल्याने एकदरा खाडीत पाण्याचा मोठ्या प्रमाणात विसर्ग होऊ लागला. याचा फटका या खाडीत उभ्या असलेल्या मच्छीमारी करणा–या बोटींना बसला. एकदरा खाडीतील पाण्याच्या प्रवाहात प्रचंड वाढ झाल्याने मच्छीमार बोटी दोर तुटून वाहून गेल्या मुरूड तालुक्यात येसदे, साळाव, सुरई, मजगांव,नांदगाव परिसरात सोमवारी रात्री झालेल्या अतिवृष्टीने परिसराला चांगलेच झोडपून काढले. बोर्ली बाजारपेठेत या पावसाचे पाणी शिरल्याने पूर्ण बाजारपेठच जलमय होऊन गेली.त्यामुळे व्यापा–यांचे अतोनात नुकसान झाले. अतिवृष्टीने सुरई डोंगरातून निघालेले पाणी चक्क बोर्ली बाजारपेठेत घुसले, बोर्ली बाजारपेठेत अंदाजे सहा फुट पाण्याची पातळी गाठली वेगाने प्रवाह सुरु होता असे येथील प्रत्यक्षदर्शी प्रगती झेरॉक्सचे दुकानदार यांनी सांगितले. बोर्ली बाजारपेठेतील सर्वच दुकानात पाणी शिरल्याने हाहाकार उडाला, दुकानातील फ्रीज इलेक्ट्रीक उपकरणे, झेरॉक्स, तसेच फोटोग्राफी व्यावसायीकांचे प्रिंटर, झेरॉक्स मशीन आदीचे विपुल नुकसान झाले, येथील हॉटेल व्यावसायिकांना नुकसानीचा जबर फटका बसला आहे, तर किराणा मालाचे दुकानातील धान्य, कडधान्य, तेल, कांदे, बटाटे आदी जीवनाश्यक वस्तूचा पुरते नुकसान झाले. रात्री अकरा ते पहाटे चार वाजेपर्यंत पाण्याची पातळी सहा फुटावर होती, त्यानंतर पावसाचा ओघ कमी झाल्याने पाणी ओसरण्यास सुरूवात झाली. दरम्यान बोर्ली बाजारपेठची पुरती वाताहत होऊन उध्वस्त झाल्याचे चित्र आहे त्यामुळे मंत्री विजय वडेट्टीवार यांनी मुरूड तालुक्याचा दौरा करावा. अशी विनंती ॲड.प्रविण ठाकूर यांनी केली आहे.


अर्जदारातर्फे वकील : ॲड.आशिष पनवेलकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या न्यायालयात

फौ.चौ.अर्ज ९२३/२०२१

श्री.प्रभुजी यंतरी गुप्ता
वय : ४८, व्यवसाय : ऑटो चालक
रा.शिवस्मृती सीएचएस बी ३२,
रुम नं.३, गुरुद्वारा रोड सेंट जोसेफ शाळा
जवळ, नवीन पनवेल, सेक्टर ७, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

मा.आयुक्त साहेब
पनवेल शहर महानगरपालिका
निबंधक जन्म व मृत्यू नोंदणी अधिकारी — सामनेवाला

तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांचा मुलगा कु.शुभम प्रभुजी गुप्ता वय : १७ यांचा जन्म दि.२५/०९/२००३ रोजी राहत्या घरी शिव स्मृती सीएचएस बी ३२ रुम नं.३, गुरुद्वारा रोड सेंट जोसेफ शाळा जवळ, नवीन पनवेल, सेक्टर ७, ता.पनवेल, जि.रायगड येथे जन्म झाला होता. अर्जदार यांचा मुलगा कु.शुभम प्रभुजी गुप्ता यांची जन्माची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात अर्ज केला आहे.

सदरहू कु.शुभम प्रभुजी गुप्ता या वर नमूद ठिकाणी जन्म झाले आहे. या संदर्भात कोणालाही काही सांगायचे असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत पनवेल येथील मे.न्यायालयात स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून हरकत घ्यावी. तसे न केल्यास न्यायालय अर्जदार यांच्याकडून योग्य तो पुरावा घेवून योग्य आदेश करेल.

आज दि.०९/०९/२०२१ रोजी सही व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/–
क.लिपीक
फौ.न्या.क.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा.अधिक्षक
फौ.न्या.क.स्तर, पनवेल



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते कि, आमचे आशिल श्रीमती.मालती के. मेनन, राहणार रूम नं. २, सातवा मजला, बिल्डिंग नं.३, नील संकुल, प्लॉट नं.२० सी, सेक्टर –११, कळंबोली, नवी मुंबई, पनवेल रायगड यांच्या मालकीची सदनिका क्र.रुम नं.२, सातवा मजला, बिल्डिंग नं.३, नील संकुल, प्लॉट नं. २० सी, सेक्टर–११, कळंबोली, नवी मुंबई , पनवेल रायगड. सदर सदनिकाची मूळ दस्त क्र. पनवेल–३–००६४५/२००७, दिनांक १८/०१/२००७ रोजीचा नोंदणीकृत कागदपत्रे श्रीमती. मालती के. मेनन यांच्याकडून गहाळ झालेली आहे व त्याबाबत कळंबोली पोलीस स्टेशन मध्ये मिळकत मिसिंग नोंदणी क्र. ०९९५/२०२१ दिनांक ०९/०९/२०२१ रोजी प्रमाणे कायदेशीर नोंद केलेली आहे.

खालील परिशिष्टात नमूद केलेली सदनिका मिळकत ही आमच्या आशिलांनी विक्री करण्याचे ठरविले असल्याने सदर मिळकतीबाबत कोणाचाही विकी, देवाण–घेवाण, गहाण, विश्वस्त संस्था, वारसा भाडेकरार, ताबा, खरेदीखत, बक्षीस, मृत्युपत्र, वाटप पत्र व इतर कोणतेही स्वरूपाचा करार असल्यास अगर इतर कोणत्याही स्वरूपाचा हक्क हित संबंध असल्यास त्यांच्या पुष्टयार्थ सर्व कागदपत्रांची पुराव्यासह खालील कार्यालयनी पत्यावर सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत सुचित करणे आवश्यक आहे. जर असा प्रकारची कोणतीही हरकत कोणीही उपस्थित केली नाही तर खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीशी कोणाचाही कसलाही हितसंबंध राहणार नाही अथवा असल्यास तो सोडून देण्यात आला आहे असे समजण्यात येईल. प्रस्तुतच्या मुदतीनंतर सदरच्या सदनिका मिळकतीबाबत कोणाचाही व कसलीही हरकत आल्यास ती ग्राहय धरली जाणार नाही व आमचे आशिल सदर परिशिष्टात वर्णन केलेल्या सदनिका मिळकतीबाबत खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे–कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड**

| नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | सोसायटीचे नांव | सदनिका क्र. |
|---|---|---|---|---|
| कळंबोली | ११ | २० सी | नील संकुल सोसायटी | ०२, बिल्डींग नं.३ |

दि.१३/०९/२०२१

सही/–
ॲड.सर्जिल बि. शेख
शॉप नं.१४, शुभ शरणम
कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.२१, सेक्टर
१५, कामोठे, नवी मुंबई–४१०२०९
मो.नं.९२२३५५२८८८

# संक्षिप्त...

## जगन्नाथ पवार यांना आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

**दै.रायगड नगरी । दिघी**

रायगड जिल्हा परिषदच्या शिक्षण विभागाकडून दिला जाणारा २०२१ जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार हा श्रीवर्धन तालुक्यातील भोस्ते शाळेचे पदवीधर शिक्षक जगन्नाथ पवार यांना मिळणार असल्याचे नुकतेच जाहीर झाले आहे.



दरवर्षी शिक्षक दिनाचे औचित्य साधून ५ सप्टेंबरला रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने १५ शिक्षकांना जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. यावर्षी या पुरस्कारासाठी जगन्नाथ पवार यांची निवड करण्यात आली.

पवार हे १९९२ साला पासून रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभागात शिक्षक पदावर कार्यरत आहेत.

त्यांची एकूण सेवा २९ वर्षे झाली आहे. त्यांनी लोकसहभागातून शालेय विकास अंतर्गत शिष्यवृत्ती परीक्षा मध्ये शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी, विज्ञान प्रदर्शन शैक्षणिक साहित्य निर्मिती, १०० ड्ढ पटनोंदनी, विद्यार्थी अल्पबचत, वृक्षारोपण, ग्रामस्वच्छता, विद्यार्थी सुविधेसाठी विविध संस्थाचे सहकार्य, शासनाच्या विद्यार्थी लाभाच्या योजना, कोविड १९ कालावधीत सहकार्य व मार्गदर्शन इ. उपक्रमात भरीव कामगिरी केली आहे.

त्यांच्या या कामगिरी बद्दल रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. यावेळी पवार यांना बहुमान मिळाल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व सुरक्षा व्यवस्थापन प्रशिक्षण संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रक्षा सामाजिक विकास मंडळ कर्जत व छत्रपती शिवाजी मंडळ, कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ४ सप्टेंबर २०२१ रोजी कर्जत परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी आपत्ती व सुरक्षा व्यवस्थापन प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणात ४० नागरिकांनी सहभाग घेतला.

संपूर्ण जगभरात निसर्गचक्रामध्ये अनियमितता आढळून येत आहे. कोणत्याही क्षणी ढगफुटी, वादळ, चक्रीवादळ, अतिवृष्टी, दरड कोसळणे अशा नैसर्गिक आपत्ती वारंवार घडत आहेत. मागील महिन्यात आलेल्या नैसर्गिक आपत्ती आपल्याला माहीतच आहे. या आपत्तींमुळे महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील विविध ठिकाणी अतोनात मानवी जीवन व वित्तहानी झाली. महाड, चिपळूण मधील घटना आपल्यासमोर आहेतच. परदेशांमध्ये या विषयांबाबत नागरिकांना प्रशिक्षण देण्यावर जास्तीत जास्त भर दिला जातो. भारता-तील काही संस्था याबाबतीत प्रशिक्षण शिबिर आयोजित करीत असतात. सर्वसामान्य नागरिकांनी आपल्या संपूर्ण कुटुंबाला नैसर्गिक व मानव निर्मित आपत्तींना कसे तोंड द्यावे व त्या संकटातून सुरक्षित कसे बाहेर पडावे, या संदर्भात प्रशिक्षित करणे अत्यंत आवश्यक आहे.



रक्षा संस्थेमार्फत वेळोवेळी विविध शैक्षणिक आस्थापनांमध्ये व सर्वसामान्य नागरिकांसाठी आपत्ती व सुरक्षा व्यवस्थापन प्रशिक्षण आयोजित करण्यात येत असते. यावेळी देखील अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर कर्जत मधील व परिसरातील नागरिकांसाठी आपत्ती व सुरक्षा व्यवस्थापन प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणात कर्जत तालुक्यातील अंबोट, दहिवली गुंडगे, कर्जत, मुद्रे, रामाची वाडी, कडाव, टेंभरे कशेळे, माथेरान तर कर्जत तालुक्याबाहेरील उल्हासनगर, कल्याण येथून ४० नागरिक सहभागी झाले होते.

या प्रशिक्षणादरम्यान मानवनिर्मित किंवा नैसर्गिक आपत्ती आल्यास, म्हणजेच अतिवृष्टी, चेंगराचेंगरी बॉम्ब स्फोट, आग लागणे, पूर येणे, भूकंप हे संकट येण्यापूर्वी कोणती काळजी घ्यावी? संकट आल्यावर कोणती काळजी घ्यावी? व आपत्ती येऊन गेल्यानंतर कोणती काळजी घ्यावी याचे प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणात श्री.राम यादव व श्री.अमित गुरव यांनी प्रशिक्षक म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली. हे प्रशिक्षण विना:शुल्क आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणासाठी छत्रपती शिवाजी मंडळाचे श्री.अशोक शिंदे, श्री.दत्तात्रय म्हसे, श्री.विनायक गुरव,श्री. राजू मोरे, श्री.संतोष गुरव व इतर सदस्य उपस्थित होते याचबरोबर या प्रशिक्षणासाठी श्री.अभिजीत मुधोळकर व कर्जत पोलिस स्टेशन यांचे मोठ्या प्रमाणावर सहकार्य लाभले. प्रशिक्षणाच्या समारोपाच्या वेळी सुरक्षा व आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षक श्री. अमित गुरव यांनी अशा प्रकारचे प्रशिक्षण घेऊन आपल्या कुटुंबियांना सुरक्षित ठेवण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांनी प्रयत्न करावेत, तसेच अशा प्रकारचे कोणतेही प्रशिक्षण आयोजित करावयाचे असल्यास, रक्षा सामाजिक विकास मंडळ यांच्याशी ०२१४१-२२३७०४ / ९४२१००८७७८ येथे संपर्क करावा,असे आवाहन केले आहे.

# जनवादी महिला संघटनेच्या जिल्हाध्यक्षा ज्योती म्हात्रे यांचे आकस्मिक निधन

**दै.रायगड नगरी । उरण**

जनवादी महिला संघटनेच्या रायगड जिल्हा अध्यक्ष कॉम्रेड ज्योती म्हात्रे (६८)यांचे काल हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ज्योती म्हात्रे यांनी उरण तालुक्यातील फुंडे ग्रामपंचायतीचे सरपंच पद दोन वेळा जबाबदारीने भूषविले आहे.रायगड जिल्हा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या त्या सदस्या होत्या.त्यांचे पती जगन्नाथ म्हात्रे हे कम्युनिस्ट पक्षाचे नेते व उरण मधिल प्रसिद्ध ग्रँडवेल कंपनीतील सीआयटीयूचे कामगार नेते म्हणून काम केले आहे.



त्यांच्या निधनाने खचून न जाता ज्योती म्हात्रे यांनी जनवादी महिला संघटनेच्या माध्यमातून आपले कार्य सुरू ठेवून उरण मधील पीडित महिलांना न्याय देण्यासाठी तसेच गोरगरीब व आदिवासी समाजाच्या समस्या घेऊन संघर्ष केला. महिला संघानेच्या वतीने गेली अनेक वर्षे बोकडविरा येथील कामगार भवनात कौटुंबिक वादविवाद मिटविण्यासाठी दोन्ही कुटुंबातील व्यक्तींना बसवून त्यांचे संसार पुन्हा उभे करण्याचे काम त्या करीत होत्या.मागील तब्बल ५० वर्षे त्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत सक्रिय होत्या.

ज्यावेळी त्यांना हृदय विकाराचा झटका आला त्यावेळी त्या मुंबईतील साकीनाका येथिल महिलेवरील अत्याचाराच्या घटनेच्या निषेधार्थ आयोजित निदर्शनात जाण्यासाठी निघाल्या होत्या. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच जनवादी महिला संघटनेच्या महाराष्ट्र राज्य सचिव प्राची हतीवलीकर,उपाध्यक्ष हेमलता पाटील,मुंबईच्या सुगंधी फ्रान्सिस ,रायगड जिल्हा सचिव अमिता ठाकूर,तारा ठाकूर,कुसुम ठाकूर,निरा पाटील या महिला नेत्यांनी तसेच जेएनपीटी चे कामगार कॉम्रेड भूषण पाटील,किसान सभेचे अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे, डी. वाय. एफ. आय. चे राज्य उपाध्यक्ष संतोष ठाकूर त्यांना श्रद्धांजली वाहिली.

# नगरसेवक राजू सोनी यांनी स्वखर्चाने उभारुन दिले पार्कींगचे फलक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक राजू सोनी यांनी स्वखर्चाने सम-विषम पार्कींगचे फलक उभारुन दिले आहेत.

शहातील वासुदेव बळवंत फडके या नवीन झालेल्या रस्त्याच्या दोन्ही बाजुला सम व विषम पार्किंगचे फलक नसल्याने लोक आपली वाहने रस्त्याच्या दोन्ही बाजुला पार्किंग करत असल्याने येथे नेहमी वाहतूक कोंडी होत होती. त्यामुळे अनेक वेळा लोकांमध्ये भांडण सुद्धा होत होती. हे सर्व स्थानिक नगरसेवक राजु सोनी यांच्या निदर्शनास आले.

त्यांनी लगेचच सम व विषम तारखेचे ९ फलक स्वखर्चाने बनवुन रस्त्याच्या दोन्ही बाजुला लावुन दिले व सतत होणाऱ्या वाहतूक कोंडीचा मार्ग मोकळा करुन दिला त्यामुळे येथील नागरिकांनी व वाहतुक पोलिसांनी राजु सोनी यांचे मनापासून आभार मानले.






ज्येष्ठ पत्रकार व दै.रायगड नगरीचे संपादक सुनील पोतदार यांच्या निवासस्थानी विराजमान झालेल्या श्री गणरायाचे दर्शन घेताना पत्रकार संजय कदम, अरविंद पोतदार, राकेश पितळे, रुपेश पितळे



ज्येष्ठ छायाचित्रकार शेखर भोपी यांच्या निवासस्थानी गणेशाची सुंदर आरास

# कळंबोली डी मार्ट येथून तरुणी बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एक २० वर्षीय तरुणी कोणास काही एक न सांगता निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



रोहिणी रामसुख यादव (२०), रंग सावळा, केस काळे व लांब, नाक सरळ, चेहरा उभट, उंची ५ फूट २ इंच असून अंगात लाल रंगाचा कुडता व त्यावर पिवळ्या रंगाची लेगीज, पायात राखाडी रंगाची चप्पल असून तिला मराठी व हिंदी भाषा अवगत आहे. ती कळंबोली डी मार्ट परिसरातून कोणास काही एक न सांगता निघून गेली आहे.

या मुलीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास कळंबोली पोलीस ठाणे किंवा पोलीस नाईक एस.व्ही.मासुळ मो.नं.८१०८९९२२९० येथे संपर्क साधावा.

# रिटघर येथे ४७ वर्षापासून एक गाव, एक गणपती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील रिटघर या गावामध्ये ४७ वर्षापासून एकच गणपती बसविण्याची परंपरा आहे. रिटघर या गा-वात ४७ वर्षापासून एक गाव, एक गणपती बसविला जातो. त्यामुळे गावात सर्वजण मतभेद विसरून गणपतीच्या आरतीला तसेच गणेशाच्या सेवेला हजर होतात. २०१६ चा विघ्नहर्ता पुरस्कार देखील या रिटघरच्या राजाला मिळाला.



रिटघर येथे १९७५ मध्ये पहिल्यांदा एक गाव एक गणपतीची संकल्पना मांडण्यात आली व त्याच वर्षापासून गावातील मंदिरात एक गणपती बसविण्यात आला. अनाठायी होणारा खर्च कमी व्हावा व आनंदाची प्राप्ती व्हावी तसेच संपूर्ण गाव एकत्रित यावा यासाठी गावातील नागरिकांनी १९७५ मध्ये एक गाव, एक गणपती सुरु केला. गावातील हनुमान मंदिरात दरवर्षी गणेशाची मूर्ती बसविली जाते. या मंदिरात सर्व आबाल वृद्ध, ग्रामस्थ, लहान मोठे, महिला हजर असतात. रिटघरचा राजा म्हणून प्रसिध्द असलेल्या या गणपतीच्या दर्शनासाठी अनेक जण बाप्पा समोर आपले गार्हाणे मांडत असतात.

सार्वजनिक गणेशोत्सवाच्या वाढत्या प्रतिसादातही 'एक गाव एक गणपती' ही परंपरा रिटघर गावाने ४७ वर्षे अबाधित ठेवली आहे. राजकारण बाजूला ठेऊन सर्व पक्षांचे प्रतिनिधित्व करणारे कार्यकर्ते गणेशोत्सवासाठी मात्र गावाचा गणपती म्हणून एकत्र काम करतात. या सार्वजनिक गणेशोत्सवाच्या सोहळ्यात वारकरी सांप्रदायिक परंपरेच्या कार्यक्रमा अंतर्गत आरती, पारायण, भजन, प्रवचन, हरिपाठ, कीर्तन, जागर, काकडा, ज्ञानेश्वरी पारायण अशा पारंपारिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. ग्रामीण भागात शक्यतो घरोघरी गणपती बसविण्याची प्रथा आहे. मात्र रिटघर गावाने 'एक गाव एक गणपती' ठेऊन समाजापुढे एक वेगळाच आदर्श ठेवला आहे. गणेशोत्सवाच्या कालावधीमध्ये गावातील ग्रामस्थ भजन, कीर्तन, आदीसह परंपरागत बाल्या नृत्याचे कार्यक्रम या ठिकाणी करत असतात. गावातील सर्वजण ग्रामस्थ स्वखुशीने वर्गणी देऊन गणेशोत्सव साजरा करतात. गावातील प्रत्येकाला गणेशाच्या सेवेचा लाभ मिळावा म्हणून काही घरातील नागरिकांना गणपतीच्या सेवेसाठी नेमली जातात. महत्वाचे म्हणजे गावात या दिवशी जुगार खेळत नसल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली. पूर्वीच्या ग्रामस्थांनी सुरु केलेला हा एक गाव एक गणपतीची परंपरा पुढे सुरूच ठेवली आहे.

लोकमान्य टिळकांच्या विचारांनी प्रेरित झालेल्या या सार्वजनिक गणेशोत्सव सोहळ्याचा आनंद एक वेगळाच आहे. सार्वजनिक गणेशोत्सव सोहळा आनंदात पार पाडण्यासाठी संपूर्ण रिटघर गाव आनंदाने, एकजुटीने यात सहभागी होतो. घरोघरी गणेशोत्सव न साजरा करता या काळात ग्रामस्थांनी बसविलेल्या गणपतीची अनंत चतुर्दशीच्या दिवशी विसर्जन केले जाते. यामुळे गावकर्यामध्ये एकोपा टिकून राहत असल्याची प्रतिक्रिया ग्रामस्थांनी दिली.

# आसूडगावातील गणेश भक्तांने साकारला नवी मुंबई विमानतळाचा देखावा

## देखाव्यात विमानतळाला नाव दि.बा.पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि बा पाटील यांचे नाव द्यावे यासाठी प्रकल्पग्रस्त ठाम असल्याचे आजही पाहायला मिळत आहे. . सध्या गणेशोत्सव सुरू झालेला आहे. दरम्यान गणपती बापाची सजावट म्हणून आंतरराष्ट्रीय विमानतळाचे देखावे बनवण्यात आलेले आहेत. आसूडगाव येथील माजी सरपंच विजय भोपी यांनीदेखील घरगुती गणेशाची आरास दि बा पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळाचा फलक असलेला देखावा साकारलेला आहे. विमानतळ ज्या ठिकाणी उभारले जाणार आहे त्याठिकाणचे हुबेहूब चित्र आपल्याला पाहायला मिळते. देखावा पाहिला तर प्रकल्पग्रस्त भूमिपुत्र आपल्या भूमिकेवर आजही ठाम आहे हे सिद्ध होते.




विजय भोपी यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले , गणपती बाप्पा विघ्नहर्ता, बुध्दीचा देवता आहे. आणि बाप्पा या महाराष्ट्र मधील उद्धव ठाकरे सरकार ला सदबुध्दी देइल आणि नवी मुंबई विमानतळाला नाव दी बा पाटील हेच दिले जाईल हाच देखावा साकारण्याच मुख्य उद्देश एवढाच आहे . पुढे ते म्हणतात, नवी मुंबईतला आगरी समाज जमिनी जाऊनही आपल्या भूमीवर राहताना दिसतोय, ते केवळ दि. बा. पाटील या नेत्यामुळे आहे. विकसित भूखंडाची योजना दिबांनी त्यावेळी सरकारला मानायला लावली नसती, तर आज इथला प्रकल्पग्रस्त दूर कुठेतरी फेकला गेला असता. इथल्या लोकांमध्ये दिबांबद्दल असलेला जिव्हाळा यातून निर्माण झालाय. आपल्या भाकरीवर दिबांचं नाव असल्याची जाणीव असल्यानं विमानातळाला त्यांच्या नावाचा होत असलेला आग्रह दिसून येतो.